# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०७/२०१८

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन काठयांनी डोक्यावर मारून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक ०७/०७/०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने त्याचा आयशर कंपनीचा ट्रक धुन्या करता चकरा तलावात नेत असतांना समोरून गायी, म्हशी, शेळया चारणारे लोक आणत असतांनी फिर्यादीने ट्रकचा हार्न वाजविल्याने जनावरे ईकडेतिकडे पळाल्याने आरोपीतांनी वाई—वाईट शिवीगाळ करून हातातील काठयांनी जाहीर कादर शेख, सोहेल सुभान पठाण, सोहेब शकील शेख सर्व रा. सहायता नगर अडयाळ यांना काठयांनी डोक्यावर मारपीट करून जखमी केले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी जहिर कादर शेख वय ३१ वर्ष रा. मश्जिद चे मागे अडयाळ यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १४३,१४७,१४८,१४९, ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी.मंडलवार पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. जिल्हाधीकारी भंडारा सा. यांचे आदेशाचे उल्लंघन केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ०७/०७/०१८ चे १९.०० ते २४.०० वाजता दरम्यान यातील आरोपींतानी मुस्लीम समाजाच्या मुलांनी हिंदुचे घरी जावुन मारपीट केल्या वरून पो.स्टे. अडयाळ गेटचे ईमारती समोर ट्रॅक्टर आडवे लावुन वाहतुकीस अडथडा निर्माण केले व गैरकायदयांची मंडळी जमवुन जमाव निर्माण केला व मा. जिल्हाधीकारी भंडारा सा यांचे आदेश कलम ३७(१)(३) मपोका.चे उल्लघंन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. अनिल नंदेश्वर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १४३,३४१ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मंडलवार पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) जातीवाचक शब्द उच्चारून अपमानीत केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक १९/०६/०१८ चे .०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व तिचे सोबतचे अन्य महिला हे आरोपी वन परीक्षेत्र अधीकारी यांचे कडे नेहमी प्रमाने मजुरीचे काम वन विभागात नर्सरीमध्ये पाहीजे या करीता जांभळी सडक जंगल शिवारात गेले असता ,आरोपीने फिर्यादी वर भडकुन जावुन चिडुन जातीवाचक शब्द उंच्चारून जास्त शहानपण करू नको चल येथुन लवकर निघ जास्त केल्या तर तुमच्यावर चोरीचा अरोप लावुन जेलमध्ये पाठवीन व तुमची वरात काढुन बेइज्जत करून अशा अपमानजनक भाषेत जातीवाचक शब्दात अपमानीत केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भादवी. सहकलम ३,(१)(आर)(एस) अजाजअप्रका.२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी श्री.तिक्कस पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) विनयभंग करून अपमान करून पाहुण घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद —**

दिनांक ०७/०७/०१८ चे १२.३० ते दि. ०८/०७/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. ०१ ते ०५ हे फिर्यादीच्या शेतात जावुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीची आई हिच्या डाव्या हाताचा चावा घेवुन तिचा विनयभंग करून फिर्यादी सोबत भांडण करून शेतातील प—याची व कंपाऊडसाठी लावलेले ५ सिंमेट पोल तोडल्याने कि.५००/रु. ची नुकशान केली तसेच फिर्यादी व त्याचे कुंटुबीय यांना जाणा—या येणा—या डांबरी रोडवर लोंकासमोर अपमान करून जातीवाचक शिवीगाळ केली व पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४,३२४,२९४,४४७,४२७,१४३,५०६ भादवी. सहकलम ३(१)(जी),३(१)(आर)३,(१),३(१) डब्ल्यु अजाजप्रका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी श्री.तिक्कस पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद —**

दिनांक ०८/०७/०१८ चे १९.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा रोडाने बडबड करीत जात असतांना आरोपीने मला पाहुण शिवीगाळ करीत असेल असे समजुन काठीने डावे हाताचे कोहनीजवळ, पाठीवर, पोटावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी सजंय सिताराम वडतकर वय ३५ वर्ष रा. करचखेडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) अवैधरित्या जनावरांची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद –**

**अ)** दिनांक ०८/०७/०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहनामध्ये ३ मोठया गाई, ज्यात १ लाल, व २ पांढऱ्या रंगाचे, ३ लहान गोऱ्या पांढऱ्या, ४ लहान गोरे ज्यात २ लहान व २ पांढऱ्या रंगाचे असे एकुण १२ जनावरे किंमती ३०,०००/–रु.चे दाटीवाटीने क्रुरतेने कोंबुन त्यांची अवैध वाहतुक करतांनी मिळुन आल्याने तसेच बोलेरो वाहन किंमती २,००,०००/–रु. असा एकुण किंमती २,३०,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चामलाटे वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड)(घ)म. प्रा.क्रू. वा. प्रति. अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**ब)** दिनांक ०८/०७/०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहनामध्ये ९ लहान मोठया गाई, किंमती २५,०००/–रु. चे निर्दतेने क्रुरतेने कोंबुन अवैध वाहतुक करतांनी मिळुन आल्याने तसेच बोलेरो वाहन किंमती २,००,०००/–रु. असा एकुण किंमती २,२५,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. गिते वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड) म.प्रा.छ. प्रति. अधिनियम १९६० सहकलम ५,५(अ),९,९(अ) म.प्रा. सं. अधि. १९७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पुढे मारण्या– पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक ०७/०७/०१८ चे २०.३५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी व त्याचे सहकारी नवरत्न बळवंत ऊईके रा. जाम हे ग्रामपंचायतचे सदस्य असुन त्याचे वार्ड बोरींगवर सौरपंप लावण्यासाठी खडयाचे खोदकाम सुरु होते. ते काम थांबविल्याने यातील आरोपी क्र. १ ने त्याचे मोबाईल वरुन फिर्यादीचे मोबाईलवर कामावर पोहचत आहे असे फोन आल्याने फिर्यादी व त्याचे सहकारी असे दोघेही रस्त्याने जात असतांना त्याना पाहुण आरोपी क्र. ३ व ४ यांनी त्यांना पकडून आरोपी क्र. २ याने फिर्यादीचे गालावर थापड मारुन मारपीट केली व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पुढे मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी दिगांबर नत्थु साठवणे वय ४३ वर्ष, रा. जाम यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**८) मोटार सायकल हयगयीने वाहन चालवुन स्वत: व पायी जाणाऱ्या इसमांस जखमी केल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक ०७/०७/०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील जखमी मोरेश्वर श्रावण वासनिक वय ४५ वर्ष, रा. मच्छेरा, धमेन्द्र उर्फ गोलु दुधा वंजारी वय २० वर्ष, रा. वडेगाव हे दोघेही बाजार करुन सिहोरा येथुन मच्छेरा कडे रोडने पायी पायी जात असता मागेहुन येणाऱ्या यातील मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने चालवुन त्यांना मच्छेरा डहाट टोली येथे धडक देवुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**९) संगनमत करुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक ०८/०७/०१८ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने तिची बहीण हिच्या नावाने स्वत: हजर राहुन तिच स्वत: असल्याचे भासवुन बहीनीच्या नावासमोर हजेरी पटावर व उत्तर पत्रीकेवर स्वत:ची खोटी सही करुन मराठी टंकलेखनाची परिक्षा दिली. त्यासाठी आरोपीने बहीनीचे प्रवेश पत्र वापरले असुन बहीनाच्या नावाने स्वत: परिक्षा हॉलमध्ये हजर राहून परिक्षकांना फसवुन बहीनीची खोटी सही करुन दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फसवणुक केल्याने फिर्यादी देवीदास विठोबा देशमुख वय ५७ वर्ष, जिल्हा सत्र न्यायालय भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४१९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चौथकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) तरुणीला व अल्पवयीन मुलगा व मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक ०७/०७/०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे मुलगी वय २० वर्ष, अल्पवयीन मुलगी वय १४ वर्ष, तसेच शेजारील मुलगा अल्पवयीन वय १६ वर्ष, यांना कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चौथकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.